ठाणे, शनिवार दि. २५ मे २०२४ वर्ष : १३, अंक : २७, पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक महाराष्ट्र सम्राट

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

अग्रलेख

**राजकारणात अभ्यासू नेत्यांची गरज**

सध्या भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात इनकमिंग सुरु आहे. आता भाजपकडे एवढी गर्दी आहे की, नेमकी कुणाला संधी द्यावी, असा गोंधळ भाजप नेतृत्वाचा झाला आहे. काँग्रेस आणि.....पान २ वर

'पुरुष' नाटकावर आधारित वेबसीरिज लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला...

...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ४१° से | किमान २८° से

**बाजार**

सोने ७१,०१० | चांदी ८१,८६०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार




साहेब, या मुलांनी कारने दुचाकीला ठोकले आणि वाहतूक सुरक्षेबद्दल निबंधही लिहून आणला आहे. त्यांना सोडून देऊ काय?

# प्रचंड वेगाने चक्रीवादळ धडकणार !

नवी मुंबई –महाराष्ट्रात अवकाळी पाऊस सुरूच आहे. या पावसाचा मोठा फटका राज्याला बसला आहे. दरम्यान या पावसाची तिव्रता आता आणखी वाढण्याची शक्यता आहे. पुढील काही दिवस मुसळधार पाऊस पडू शकतो.हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होत असून, चक्रीवादळाची निर्मीती होत आहे. चक्रीवादळामुळे देशभरात मुसळधार पावसाची शक्यता आहे. चक्रीवादळाच्या प्रभावामुळे ओडिशा, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश आणि इतर राज्यातील किनारपट्टी प्रदेशात मोठ्या हवामान बदलाची शक्यता आहे.



महाराष्ट्राबाबत बोलायचे झाल्यास येत्या दोन ते तीन दिवसांत या वादळाचा काहीप्रमाणात तडाखा हा राज्याला देखील बसू शकतो. कमी दाबाच्या पट्ट्यामुळे मुसळधार पावसाची शक्यता आहे. या काळात राज्यात ५० ते ६०

## IMD ने दिला नवा अर्लट

किमी वेगाने वारे वाहू शकतात असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. कोकण, मराठवाडा, विदर्भात अवकाळी पावसाची शक्यता हवामान विभागाचा अंदाज राज्यासह देशात सध्या ऊन-पावसाचा खेळ पाहायला मिळत आहे. कुठे उष्णतेची लाट पाहायला मिळत आहे. तर कुठे अवकाळी पावसाचा तडाखा बसताना दिसत आहे. पुढील काही दिवस महाराष्ट्रात काही भागात जोरदार पावसाची शक्यता पाहायला मिळणार आहे. कोकण, मराठवाड्यासह विदर्भात पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज आहे. या व्यतिरिक्त इतर भागात उष्णतेच्या झळा बसण्याची शक्यता असून काही ठिकाणी तापमानात एक ते दोन अंश सेल्सिअस वाढ होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्र जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी, उत्तर कोंकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्र जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ

**तर कोकण, मराठवाडा, विदर्भात अवकाळी पावसाची शक्यता हवामान विभागाचा अंदाज**

हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. यावेळी ४० ते ५० किमी प्रतितास वेगाने सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा पाहायला मिळणार असून हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. दक्षिण मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या (पान २ वर)

# बनावट एव्हरेस्ट व मॅगी मसाला विक्री करणाऱ्या दोघांना अटक




भिवंडी – भिवंडी शहरातील कामगार वस्ती वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टी विभागात राहणाऱ्या गरीब नागरिकांच्या अशिक्षितपणाचा गैरफायदा घेऊन मोठया प्रमाणावर बनावट खाद्यपदार्थ विक्री केल्याच्या तक्रारी वाढत आहे. मागील चार महिन्यांपूर्वी बनावट जिरे विक्री करणाऱ्यांना अटक केल्यानंतर आता बनावट एव्हरेस्ट मसाले विक्री करणाऱ्यांचा शांतीनगर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. दोघा जणांना ताब्यात घेत त्यांच्या जवळून १ लाख ८ हजार रुपये किमतीचा बनावट मसाल्याचे पाकीट जप्त करण्यात आले आहेत अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली आहे. (पान २ वर)

### फॅक्टरी सील करून कारवाई

टेम्पो चालक महेश लालताप्रसाद यादव आणि माल विक्रीसाठी आलेला मोहमद सलमान मोहमद अफजल प्रधान दोघे रा. जोगेश्वरी यांना ताब्यात घेत त्यांच्याकडे चौकशी केली. चौकशीत हे बनावट पॅकिंग माल गुजरात राज्यातील सुरत येथील फॅक्टरीमध्ये बनवून महाराष्ट्रासह गुजरात, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांत विक्री केला जात असल्याचे समजले. पोलिस पथकाने सुरत येथील ईश्वरनगर सोसायटी, पर्वतगाव येथे छापा टाकला. करण सुरेशभाई मेवाड हा बनावट मसाला तयार करीत असल्याचे आढळून आल्याने पोलिस पथकाने तेथील कच्चा माल आणि मशीन व फॅक्टरी सील करून कारवाई केली आहे.

### नागरिकांच्या आरोग्याशी खेळ

खऱ्या एव्हरेस्ट मसाले पाकिटावर ई हॉलमार्क असतो. परंतु बनावट पाकिटावर असा हॉलमार्क आढळून आला नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा हा प्रकार असून त्यामुळे एव्हरेस्ट कंपनीच्या सेल्समन यांनी दिलेल्या तक्रारीवरून या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नागरिकांनी सुद्धा आपण वापरत असलेले पॅक बंद खाद्य पदार्थ खरेदी करीत असताना त्याच्या खरे पणाची खात्री करून घ्यावी असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी केले आहे.

**थोडक्यात घडामोडी**

### मुंब्रा खाडीत ४० वर्षीय इसमाचा मृतदेह आढळला

ठाणे - आज दिनांक २४/०५/२०२४ रोजी सकाळी ०७:५० वाजताच्या सुमारास आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडे प्राप्त झालेल्या घटनेच्या माहितीनुसार आत्माराम घाट जवळ, रेतीबंदर खाडी, रेतीबंदर, मुंब्रा, ठाणे (प.) या ठिकाणी आत्माराम विसर्जना घाट जवळ खाडीमध्ये एका अज्ञात व्यक्तीचा (पू./ वय- अंदाजे ४० ते ४५ वर्षे) या व्यक्तीचा मृतदेह आढळला होता. सदर घटनास्थळी मुंब्रा पोलीस स्थानकाचे अधिकारी व कर्मचारी ०१- शववाहिकेसह, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१- पिकअप वाहनासह, स्थानिक मच्छीमार ०१- बोटसह व अग्निशमन दलाचे जवान ०१- रेस्क्यु वाहनासह उपस्थित होते. सदर घटनास्थळी आपत्ती (पान २ वर)

डोंबवलीत मे. अंबर केमिकल कंपनीत स्फोटप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

# स्फोट प्रकरणातील मुख्य आरोपी मलया मेहताला आईसह घेतले ताब्यात

प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेकडे वर्ग...

मृतकांचा आकडा 13 वर





ठाणे (वार्ताहर)- ठाण्याच्या डोंबवली परिसरातील मे. अंबर केमिकल कंपनी, मेट्रो कंपनी जवळ, एम.आय.डी.सी. फेज-०२, सोनारपाडा, मानपाडा, डोंबिवली (पुर्व). या ठिकाणी डोंबिवली एम.आय. डी.सी. मध्ये स्फोट होऊन भीषण आग लागली होती.या दुर्घटनेत आसपासच्या कंपन्यांमध्येही आग लागल्याने १३ जणांचा मृत्यू झाला असून ५५ जखमी झालेले आहेत. तर जखमींमध्ये पाच जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती सूत्रांनी दिली. (सविस्तर वृत्त पान २...)

### डोंबिवलीतील स्फोटाला शिंदे सरकार जबाबदार–अंबादास दानवेंचा आरोप



डोंबिवलीच्या एमआयडीसीत काल स्फोट होऊन मोठी दुर्घटना घडली आहे. आता या दुर्घटनास्थळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे दाखल झाले आहेत. त्यांनी घटनास्थळी पाहणी करत सगळी माहिती घेतली आहे. डोंबिवलीतील स्फोटाला शिंदे सरकार जबाबदार आहे. महाविकास आघाडीच्या काळात येथील ५ कंपन्या हलवण्याचा निर्णय झाला होता. मात्र शिंदे सरकारने पुढे काहीच पाऊल उचलले नाही, असेही अंबादास दानवे म्हणाले. महाराष्ट्रात सातत्याने असे अपघात होत आहेत. आम्ही सातत्याने यासंदर्भात आवाज उठवला आहे. सरकारचे बॉयलरबाबतीतलं धोरण चुकीचं आहे. तसेच यासंदर्भातील सरकारचं खातं अकार्यक्षम आहे. औद्योगिक सुरक्षेबाबत सरकारकडून कमालीचं दुर्लक्ष केलं जात आहे. यात कामगारांचे प्राण जात आहेत, सरकारच्या दुर्लक्षामुळे अशा घटना घडत आहेत, असा आरोप अंबादास दानवेंनी केला.



डोंबिवली MIDC येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनास्थळाची केली पाहणी केल्यानंतर जखमींना भेटण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हॉस्पिटलमध्ये पोहचले व तेथील रुग्णांची विचारपूस केली.

## डोंबिवलीतल्या स्फोटानंतर एमआयडीसीवर जितेंद्र आव्हाडांचा गंभीर आरोप; म्हणाले फायर ऑडिट..

स्फोटानंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. यावरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी एमआयडीसीवर आरोप केले आहेत. दोन वर्षांपासून एमआयडीसीकडून कोणत्याही कंपनीचे फायर ऑडिट करण्यात आलेले नाही, असे ते म्हणाले. त्यांनी टीव्ही ९ वृत्तवाहिनीला यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.



एखादी दुर्घटना घडू नये, यासाठी जी काळजी घ्यायची असते ती प्रशासनिक पातळीवर कधीच घेतली जात नाही. महत्त्वाचे म्हणजे फायर ऑडिटसारखी गोष्ट महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याच विभागाद्वारे केली जात नाही. त्यामुळे आग लागल्यावर ज्या उपाय योजना कराव्या लागतात, त्या योग्य वेळत होते नाही. त्यामुळे आग वाढते आणि अनेकांचा मृत्यू होतो. माध्यमं दोन दिवस बातमी चालवतात. नंतर सगळं विसरून जातात. मृत्यू झालेल्यांना काही आर्थिक मदत दिली जाते. मात्र, त्यानंतर त्या घटनेची कोणतीही चर्चा होत नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया जितेंद्र आव्हाड यांनी दिली.

पुढे बोलताना त्यांनी गेल्या दोन वर्षात एमआयडीसीकडून कोणत्याही कंपनीचे फायर ऑडिट करण्यात आले याची श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणीही केली. डोबिंवलीत दोन वर्षांपूर्वीही अशाच प्रकारची घटना घडली होती. त्यावेळी घराघरात आग पोहोचली होती. त्यानंतर आजपर्यंत अशा घटना घडू नये, यासाठी कोणत्याही उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. तेव्हापासून आजपर्यंत एमआयडीसीने किती कंपन्यांचे फायर ऑडिट केले याची श्वेतपत्र काढावे, असे ते म्हणाले.

# ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची धडक कारवाई

ठाणे - अडीच महिन्याच्या बाळाचा सौदा करण्यासाठी नाशिक येथून मुंबर्यात विक्री करणायचा खटाटोप करणार्या महिला दलाल, पुरुष दलाल, तृतीय पंथी आणि बाळाच्या आईसह ९ जणांना बेड्या ठोकण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पथकाला यश मिळाले. अटक आरोपींच्या विरोधात मंत्रा नाशिक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला असून अधिक तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पथक करीत असल्याची माहिती गुन्हे शाखा आहेत. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष वपोनि चेतना चौधरी यांनी दिली.

ठाणे गुन्हे शाखा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पथकाला १५ दिवसापूर्वी सदारच्या गुन्ह्याची माहिती मिळाले होती. मुंब्रा अमृतनगर परिसरात राहणारे साहिदा आणि साहिल यांच्यासह इतर सहकारी दलाल मिळून स्त्री जातीच्या ८४ दिवसाच्या बाळाची विक्री करण्यासाठी प्रयत्न करीत असून ग्राहक शोधत असल्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतना चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने (पान २ वर)



**बाळ विक्री प्रकरणाचा १५ दिवस केला पाठपुरवा**

८४ दिवसाचे स्त्री जातीचे बालकास नाशिक येथुन मुंब्रा, जि. ठाणे येथे विक्रिसाठी घेवुन आलेल्या महिला दलाल, पुरुष दलाल, तृतीय पंथी (किन्नर) व बाळाचे आईसह एकुण ९ आरोपीआना अटक करण्याची धडक कारवाई अनैतिक मानवी प्रतिबंध विभागाच्या पथकाने केली. (छाया - मनोज सिंह)

शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृती आणण्याचा भाजपा सरकारचा प्रयत्न म्हणजे जुने बुरसटलेले विचार व वर्ण भेदाला पुरस्कृत करण्याचा प्रकार आहे. भाजपाला देशाच्या भवितव्याची चिंता नसून मनुवादी विचारांच्या –हासाची चिंता आहे म्हणूनच शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचा समावेश करण्याचे घाटत आहे. राज्याचा शालेय अभ्यासक्रम आराखडा ने जाहीर केला आहे. यात मनुस्मृतीचा समावेश आहे. हा प्रकार मनुची विभाजनकारी मूल्ये विद्यार्थ्यांच्या निरागस मनावर लादण्याच्या डाव असून काँग्रेसचा याला तीव्र विरोध आहे. अभ्यासक्रम आराखड्यातून हा आक्षेपार्ह भाग काढवा अन्यथा तीव्र आंदोलन करू, असा इशारा माजी शालेय शिक्षण मंत्री व मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष प्रा. वर्षा गायकवाड यांनी दिला आहे.

शालेय अभ्यासक्रम आराखड्यातील मनुस्मृतीचा भाग वगळा

# ...अन्यथा रस्त्यावर उतरुन जाब विचारु -प्रा. वर्षा गायकवाड

- शालेय अभ्यासक्रमात मनुस्मृतीचा समावेश करण्याचा प्रकार म्हणजे जुने बुरसटलेले विचार व वर्णभेदाचा पुरस्कार.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान बाजूला सारून देशात मनुस्मृती लागू करायचा भाजपाचा डाव.
- बहुजन समाजातील मुलामुलींना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा भाजपा-आरएसएसचा प्रयत्न.

भाजपा सरकारवर हल्लोबल करत प्रा. वर्षा गायकवाड पुढे म्हणाल्या की, भाजपा-आरएसएस संविधान बदलून देशात मनुस्मृती लागू करू



पाहत आहेत हे उघड आहे. लोकसभेत ४०० जागांच्या बहुमतासह सत्ता मिळाली की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान बदलणार अशी जाहीर भाषा भाजपाच्या नेत्यांनी केली आहे आणि आता नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार जाहीर झालेला महाराष्ट्र राज्याच्या शालेय अभ्यासक्रम आराखड्यात (एससीएफ) मूल्ये आणि स्वभाववृत्ती या घटकाची सुरुवात मनुस्मृतीतील श्लोकाने करण्यात आली आहे. ज्या मनूस्मृतीमुळे वर्णव्यवस्था निर्माण केली, बहुजन समाजाला शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप केले. ज्या मनूस्मृतीमध्ये महिलांना समाजात दुय्यम स्थान देण्यात आले आणि ज्या मनुस्मृतीला महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हातांनी जाळले त्याच मनुस्मृतीचा अभ्यास शाळेकरी विद्यार्थ्यांनी करायचा का? असा संतप्त सवाल वर्षा गायकवाड यांनी केला आहे.

संविधानातील व्यापक मूलतत्त्वे, सर्वसमावेशकता विद्यार्थ्यांच्या मनावर कोरली जावीत यासाठी महाविकास आघाडी सरकारने संवैधानिक शिक्षण अधिक व्यापकपणे शालेय शिक्षणात अंतर्भूत करावे याकरिता प्रक्रिया सुरू केली होती पण मनुवादी सरकारने ती प्रक्रिया थांबवली आणि आता ते मनुची विभाजनकारी मूल्ये विद्यार्थ्यांच्या निरागस मनावर लादण्याच्या तयारीत आहेत. याचा अर्थ स्पष्ट आहे की भाजपाला संविधान बाजूला सारून देशात मनुस्मृती लागू करायची आहे. सरकारच्या या समाजविरोधी, संविधानविरोधी, विद्यार्थी विरोधी निर्णयाचा काँग्रेस पक्ष तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत आहे. (पान २ वर)

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

■ पदाचे नाव : विद्युत सहाय्यक
शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
■ वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
■फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## इंडियन आर्मी डेंटल कॉर्प्स भरती

■ पदाचे नाव: शार्ट सर्विस कमिशन ऑफिसर
■ शैक्षणिक पात्रता: (i) ५५% गुणांसह BDS/MDS (ii) एक वर्षाची रोटेटरी इंटर्नशिप पूर्ण (iii) NEET (MDS)-२०२४
■ वयाची अट: ३१ डिसेंबर २०२४ रोजी ४५ वर्षांपर्यंत.
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट : https://www.indianarmy.nic.in/

## भारतीय हवाई दलात अग्निवीरवायु (संगीतकार) पदाची भरती

■ कोर्सचे नाव: अग्निवीरवायु इनटेक ०१/२०२५
जागा : पद संख्या तूर्तास निर्दिष्ट नाही.
पदाचे नाव: अग्निवीरवायु (संगीतकार)
■ शैक्षणिक पात्रता: (i) १०वी उत्तीर्ण (ii) संगीत अनुभव प्रमाणपत्र/डिप्लोमा
■ शारीरिक पात्रता: उंची/छाती पुरुष महिला , उंची १६२ सेमी १५२ से.मी.
छाती ७७ से.मी./किमान ०५ सेमी फुगवून. -
वयाची अट: जन्म ०२ जानेवारी २००४ ते ०२ जुलै २००७ दरम्यान.
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०५ जून २०२
■ मेळाव्याचा कालावधी: ०३ ते १२ जुलै २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://indianairforce.nic.in/

## यूपीएससीमार्फत संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा २०२४

■ परीक्षेचे नाव: संयुक्त संरक्षण सेवा परीक्षा (CDS-II) २०२४
■ पदाचे नाव/कोर्सचे नाव
१ भारतीय भूदल (मिलिटरी) अकॅडेमी, डेहराडून १५९
२ भारतीय नेव्हल अकॅडेमी, एझीमाला, Executive (General Service)/Hydro
३ हवाई दल अकॅडेमी, हैदराबाद,No. 218 F(P) Course
४ ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडेमी (पुरुष) चेन्नई, 122nd SSC (Men) Course (NT)
५ ऑफिसर्स ट्रेनिंग कॅडमी (महिला) चेन्नई,-36th SSC Women (Non-Technical) Course
■ जागा : ४५९
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: पदवीधर.
पद क्र.२: इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: पदवी (Physics and Mathematics at 10+2 level) किंवा इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.४: पदवीधर.
पद क्र.५: पदवीधर.
■ वयाची अट:
पद क्र.१: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
पद क्र.२: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
पद क्र.३: जन्म ०२ जुलै २००१ ते ०१ जुलै २००५ दरम्यान.
पद क्र.४: जन्म ०२ जुलै २००० ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
पद क्र.५: जन्म ०२ जुलै २००० ते ०१ जुलै २००६ दरम्यान.
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ०४ जून २०२४
■ लेखी परीक्षा: ०१ सप्टेंबर २०२४
■ अधिकृत वेबसाईट:

### भारतीय सैन्य १०+२ टेक्निकल एंट्री स्कीम कोर्स

■ कोर्सचे नाव: १०+२ टेक्निकल एंट्री स्कीम कोर्स ५२-जानेवारी २०२५
■ शैक्षणिक पात्रता: ६०% गुणांसह १२वी उत्तीर्ण २०२४ मध्ये उपस्थित.
■ वयाची अट: जन्म ०२ जुलै २००४ ते ०१ जुलै २००७ च्या दरम्यान.
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत.
■ फी नाही.
■अर्ज करण्याची शेवटची तारीख: १३ जून २०२४ (१२:०० )
■ अधिकृत वेबसाईट : https://www.indianarmy.nic.in/

## आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

■ जागा : २०
■ ज्युनियर रिसर्च फेलो
■ रिसर्च असोसिएट
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B.Tech+NET/ GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET
पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव
वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: पुणे
■ अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune- 411021
■ अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde


## सीमा सुरक्षा दल

■ combatised/group_B/2024 1 इंस्पेक्टर (Librarian)
■ combatised/group_B_C/2024 2 सब इंस्पेक्टर (Staff Nurse)
■ असिस्टंट सब इंस्पेक्टर (Lab Tech)
■ असिस्टंट सब इंस्पेक्टर (Physiotherapist)
■ SMT_WKSP/२०२४ सब इंस्पेक्टर (Vehicle Mechanic)
■ कॉन्स्टेबल (OTRP)
■ कॉन्स्टेबल (SKT)
■ कॉन्स्टेबल (Fitter)
■ कॉन्स्टेबल (Carpenter)
■ कॉन्स्टेबल (Auto Elect)
■ कॉन्स्टेबल (Veh Mech)
■ कॉन्स्टेबल (BSTS)
■ कॉन्स्टेबल (Upholster)
Veterinary_Staff/2024 हेड कॉन्स्टेबल (Veterinary)
■ हेड कॉन्स्टेबल (Kennelman)
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: ग्रंथालय विज्ञान किंवा ग्रंथालय आणि माहिती विज्ञान या विषयात पदवी.
पद क्र.२: (१) १२वी उत्तीर्ण (२) जनरल नर्सिंग डिप्लोमा/पदवी
पद क्र.३: (१) १२वी (सायन्स) उत्तीर्ण (२) डीएमएलटी
पद क्र.४: (१) १२वी (सायन्स) उत्तीर्ण (२) फिजियोथेरपिस्ट डिप्लोमा/पदवी (३) ०६ महिने अनुभव
पद क्र.५: ऑटोमोबाईल/ मेकॅनिकल डिप्लोमा/पदवी
पद क्र.६ ते १३: (१) १०वी उत्तीर्ण (२) संबंधित ट्रेड मध्ये
पद क्र.१४: (१) १२वी उत्तीर्ण (२) व्हेटर्नरी स्टॉक असिस्टंट कोर्स (३) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.१५: (१) १०वी उत्तीर्ण (२) शासकीय पशुवैद्यकीय रुग्णालय किंवा दवाखाना किंवा पशुवैद्यकीय महाविद्यालय किंवा शासकीय पशु फार्म येथून जनावरे हाताळण्याचा दोन वर्षांचा अनुभव.
■ वयाची अट: १७ जून २०२४ रोजी, /: ०५ वर्षे सूट, : ०३ वर्षे सूट
पद क्र.१ ५: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.२: २१ ते ३० वर्षे
पद क्र.३: १८ ते २५ वर्षे
पद क्र.४: २० ते २७ वर्षे
पद क्र.६ ते १५: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी /: फी नाही
पद क्र.1,2, 5, 14 & 15: General/OBC/EWS: ₹200/-
पद क्र..3,4, 6 ते13: General/OBC/EWS: ₹100/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: १७ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.bsf.gov.in/

# ‘सिंघम अगेन’ मधील अजय देवगणचा पहिला लूक आला समोर

बॉलीवुड अभिनेता अजय देवगणचं नाव घेतलं की त्याची ‘सिंघम’ व्यक्तिरेखा डोळ्यासमोर आल्याशिवाय राहत नाही. हाच प्रेक्षकांचा लाडका सिंघम पुन्हा एकदा आपल्या भेटीला येण्यासाठी सज्ज झालाय. अजय देवगण पुन्हा एकदा ‘सिंघम अगेन’ या चित्रपटातून आपल्याला डॅशिंग पोलिसाच्या भूमिकेत दिसेल. त्याच्या या आगामी चित्रपटाचे चित्रीकरण सध्या जम्मू-काश्मीर मध्ये सुरु झाले आहे. या चित्रपटातील अजय देवगणचा पहिलाच लूक चाहत्यांसमोर आला आहे. अजय देवगणसोबतच अक्षयकुमार, रणवीर सिंग, टायगर श्रॉफ, करीना कपूर , दीपिका पदुकोण आणि अर्जुन कपूर यांच्याही या सिनेमात महत्त्वपूर्ण भूमिका आहेत.

‘सिंघम अगेन’चे दिग्दर्शक रोहित शेट्टी यांनी शुक्रवारी या चित्रपटातील अजय देवगणची पहिली झलक आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून शेअर केली आहे. या लूकमध्ये अजय देवगण सिंघमच्या रुपात अवतरलेला



दिसतोय. तयाच्या पाठी उभ्या असलेल्या अनेक पोलिसांच्या गाड्यांमुळे त्याचा हा लूक सिंघम चित्रपटाच्या सिरीजपेक्षा सूर्यवंशी फिल्मशी मिळताजुळता वाटतोय असं चाहत्यांचं म्हणणं आहे. सूर्यवंशी चित्रपट २०२१ मध्ये आला होता. या चित्रपटात अजय देवगण आणि रणवीर सिंग यांनी पाहुण्या कलाकाराच्या भूमिका केल्या होत्या. यानंतरच ‘सिंघम अगेन’ मध्ये अक्षयकुमार आणि रणवीर सिंग यांना एकत्र पाहायला मिळेल असं जाहीर करण्यात आलं होतं.

‘सिंघम अगेन’ ही ‘सिंघम सिरीज’ मधली रोहित शेट्टीची तिसरी फिल्म आहे. ‘सिंघम अगेन’ ची रिलीज डेट १५ ऑगस्ट ठरवण्यात आली होती. परंतु पुष्पा २ हा चित्रपटदेखील याचदरम्यान प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ‘सिंघम अगेन’ च्या रिलीज डेटबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. त्याच्या नव्या रिलीज डेटबद्दल अजूनही खात्रीशीर तारीख मात्र अद्याप समोर आलेली नाही.

# ताजे की पॅकबंद? कोणते नारळ पाणी आरोग्यासाठी चांगले?

सध्या उन्हाळा सुरू आहे.
उन्हाळ्यात उष्णतेपासून वाचण्यासाठी आणि शरीरात पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी जास्तीत जास्त द्रव्य पदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. उन्हाळ्यात भरपूर पाणी पिणे जसे गरजेचे आहे तसेच फळांचा रस, नारळाचे पाणीसुद्धा पिणे आवश्यक आहे. तुम्हाला ताजे नारळाचे पाणी प्यायला आवडते की पॅकबंद?
कोणते नारळाचे पाणी आपल्या आरोग्यासाठी चांगले आहे, याविषयी द इंडियन एक्स्प्रेसनी तज्ज्ञांच्या हवाल्याने या विषयी सविस्तर माहिती सांगितली आहे.
जिंदाल इन्स्टिट्यूटच्या आहारतज्ज्ञ सुष्मा पीएस यांनी पॅकबंद नारळाच्या पाण्याचे काही दुष्परिणाम सांगितले आहेत. त्यापूर्वी नारळाचे पाणी आपल्या आरोग्यासाठी कसे चांगले आहे, याविषयी जाणून घेऊ या.
नारळाचे पाणी हे एक नैसर्गिक पेय आहे. यामध्ये पोटॅशियम, सोडियम आणि मॅग्नेशियमसारखे इलेक्ट्रोलाइट्सचे प्रमाण आढळतात. उन्हाळ्यात हे इलेक्ट्रोलाइट्स शरीरातील पाण्याची मात्रा संतुलित ठेवण्यास मदत करतात. उजाला सिग्नस ग्रुप ऑफ हॉस्पिटलच्या आहारतज्ज्ञ डॉ. एकता सिंघवाल सांगतात, नारळाच्या पाण्यामध्ये सायटोकिन्स असतात, जे पेशींच्या वाढीस, कर्करोगाविरुद्ध लढण्यास आणि एकंदरीत संपूर्ण शरीर निरोगी ठेवण्यास मदत करतात.

### ताजे नारळाचे पाणी की पॅकबंद नारळाचे पाणी?

पॅकबंद नारळाचे पाणी दीर्घकाळ टिकावे म्हणून त्यावर रासायनिक प्रक्रिया केली जाते, ज्यामुळे ताज्या नारळाच्या पाण्यातील पौष्टिक घटक आणि चव कमी होते, असे सुष्मा सांगतात.
नारळाच्या पाण्यामध्ये ९४ टक्के पाणी, पाच टक्के साखर (अल्डोहेक्सोज, फ्रॅक्टोज आणि डिसॅकराइड) असतात; याशिवाय यात भरपूर प्रमाणात कॅल्शियम आणि मॅग्नेशियमसारखे खनिजे असतात.
चेन्नई येथील क्लाउडनाईन ग्रुप ऑफ हॉस्पिटलच्या न्यूट्रिशनिस्ट डॉ. हरिप्रिया एन. सांगतात, जेव्हा या नारळाच्या पाण्यावर प्रक्रिया केली जाते, तेव्हा हवेच्या संपर्कात येऊन त्याच्यातील पौष्टिक घटक कमी होतात.
पॅकबंद नारळाचे पाणी दीर्घकाळ टिकवण्यासाठी आणि चव राखण्याठी उत्पादक त्यामध्ये डिटीव्ह आणि बायो-प्रिझर्वेटिव्ह वापरू शकतात. त्यामध्ये साखर, आर्टिफिशिअल फ्लेवर्सचा समावेश असू शकतो. त्यामुळे नारळाचे ताजे पाणी प्यायल्याने तुम्ही या गोष्टी टाळू शकता आणि निरोगी असे नारळाचे पाणी पिऊ शकता, असे डॉ. हरिप्रिया सांगतात.
सुष्मा पीएस लक्षात आणून देतात की, पॅकबंद नारळाच्या पाण्याचे कंटेनर हे प्लास्टिक किंवा अविघटनशील घटकांपासून बनतात, ज्यामुळे पर्यावरणाला हानी पोहचू शकते.याशिवाय पॅकबंद नारळाचे पाणी अस्सल ताजे नसते. ताज्या नारळाच्या पाण्याची एक वेगळी चव असते, पण ही चव आता पॅकबंद पद्धतीमुळे हरवली आहे, असे त्या पुढे सांगतात.
पॅकबंद नारळाच्या उत्पादनादरम्यान स्वच्छता आणि गुणवत्ता पाळली नाही तर ते पाणी आरोग्यासाठी अधिक धोकादायक ठरू शकते. ताज्या नारळामध्ये असा कोणत्याच प्रकारचा धोका निर्माण होत नाही, असे हरिप्रिया सांगतात.
नारळ विकत घेणे आणि त्यातून स्वत: पाणी काढणे हे पॅकबंद नारळाच्या पाण्यापेक्षा कमी खर्चिक असू शकते. नारळ खरेदी केल्याने आपण ताजे पाणी पित आहोत, याची खात्री पटते. यातून तुम्हाला फायबर आणि चांगले फॅट्स मिळू शकतात. त्यामुळे ताजे नारळाचे पाणी आपल्या आरोग्यासाठी उत्तम असून जे आपल्याला चांगल्या चवीसह, पौष्टिक घटक प्रदान करतात.





# ‘पुरुष’ नाटकावर आधारित वेबसीरिज लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला

## सचिन खेडेकर ‘गुलाबराव’ साकारणार?

सिद्धहस्त लेखक जयवंत दळवी यांच्या लेखणीतून उतरलेलं आणि मराठी रंगभूमी गाजवणारं पुरुष नाटक पुन्हा एकदा चर्चेत आलं आहे. कारण या नाटकावर आधारित वेब सीरिज आता प्रेक्षकांच्या भेटीला येते आहे. पुरुष हे नाटक लेखक जयवंत दळवी यांनी पुरुषी मनोवृत्ती आणि खासकरुन ज्यांचा उल्लेख गेंड्याची कातडी असलेला पुढारी असा केला जातो अशा लोकांची मानसिकता ही कशी असते हे दाखवणारं नाटक होतं. हे नाटक जेव्हा रंगभूमीवर आलं तेव्हा नाटकात गुलाबराव जाधव हे पात्र नाना पाटेकरांनी साकारलं होतं. तर अंबू हे पात्र रिमा लागू यांनी साकारलं होतं.

### पुरुष या नाटकाचं कथानक काय?

पुरुष या नाटकाची नायिका अंबिका आहे. तिचे वडील शिक्षक आहेत. त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. एका शिक्षकाच्या घरातली संस्कारक्षम मुलगी पुरुष प्रधान संस्कृतीशी बरोबरी करु पाहते. समाजातल्या पुरुषांबरोबर खांद्याला खांदा मिळवून काम करु पाहते. हे सगळं गुलाबराव जाधव या निर्ढावलेल्या पुढाऱ्याला बघवत नाही. एका पुरुषी अहंकारातून तो तिच्यावर बलात्कार करतो. इतक्या मोठ्या आघाताने अंबिका खचून जाईल असं गुलाबराव जाधवाला वाटत असतं पण तसं घडत नाही. उलट ती त्याला धडा शिकवते. असं या नाटकाचं थोडक्यात कथानक आहे.

### १९८२ मध्ये आलं होतं नाटक

१९८२ मध्ये हे नाटक सर्वात आधी प्रेक्षकांच्या भेटीला आलं होतं. नाना पाटेकर, रिमा लागू, चंद्रकांत गोखले, उषा नाडकर्णी, सतीश पुळेकर अशा दिग्गज कलाकारांच्या या नाटकांत भूमिका होत्या. नाटक आल्यापासूनच प्रेक्षकांना खूप भावलं. या नाटकावर आधारित एक हिंदी चित्रपटही आला होता. तसंच ९० च्या दशकानंतर या नाटकाचे हिंदी प्रयोगही झाले. ज्यात अंबिकाची भूमिका आयेशा झुल्काने केली होती. पुरुष या नाटकातला गुलाबराव नाना पाटेकरने त्याच्या अभिनयाने अजरामर केला आहे. या नाटकाचे काही प्रयोग मोहन जोशींनीही केले होते. युट्यूबवर व्हिडीओ रुपात जे नाटक आहे त्यातला गुलाबराव मोहन जोशीच आहेत. आता वेबसीरिजच्या रुपात पुरुष नाटक लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येतं आहे. प्लॅनेट मराठीतर्फे ही वेबसीरिज आणण्यात येते आहे.

### सचिन खेडेकर गुलाबराव साकारणार?

वेबसीरिजचा प्रोमो प्लॅनेट मराठीच्या इंस्टाग्राम हँडलवर पोस्ट करण्यात आला आहे. फोनवरच्या संवादाने या प्रोमोची सुरुवात होते. संवाद ऐकतानाच वेबसीरिज पुरुषप्रधान असणार आहे हे समजतं कारण नाटकही तसंच होतं. आता या वेबसीरिजमध्ये गुलाबराव आणि अंबिका ही दोन पात्रं कोण साकारणार हे अद्याप गुलदस्त्यात आहे.प्रसन्न आजरेकर, श्रीरंग गोडबोले आणि अभिजित पानसे पुरुष ही वेबसीरिज घेऊन येत आहेत. प्लॅनेट मराठी या ओटीटी ॲपवर ही वेबसीरिज प्रदर्शित होणार आहे. अक्षय बर्दापूरकर यांनी सीरिजची निर्मिती केली आहे. सचिन खेडेकर गुलाबरावच्या भूमिकेत आणि मृण्मयी देशपांडे अंबिकाच्या भूमिकेत दिसण्याची शक्यता आहे.

# ‘इंडिगो’ला वाढत्या प्रवासी संख्येने दुपटीने नफा

आघाडीची हवाई वाहतूक कंपनी इंडिगोचा नफा मार्चअखेर तिमाहीत दुपटीने वाढत १,८९४.८ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. गेल्यावर्षी याच तिमाहीत कंपनीने ९१९.२ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळविला होता. बरोबरीने २०२३-२४ या सरलेल्या आर्थिक वर्षात कंपनीने १८,५०५.१ कोटी रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळविले असून एकत्रित ८,१७२.५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा कमावला आहे.
आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत, इंडिगोने सेवा दिलेल्या प्रवासी संख्या गेल्या वर्षापूर्वीच्या कालावधीच्या तुलनेत १० ते १२ टक्क्यांनी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मार्च २०२४ अखेर तिमाहीत कंपनीचे एकूण उत्पन्न सुमारे २७ टक्क्यांनी वाढून १८,५०५.१ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. वर्षभरापूर्वीच्या काळात ते केवळ १४,६००.१ कोटी रुपये होते. दरम्यान कंपनीच्या इंधन खर्चात ६.५ टक्क्यांची वाढ झाली एकंदर खर्च २२.३ टक्क्यांनी वधारला आहे. कंपनीला वर्ष २०२-२३ मध्ये ३०५.८ कोटींचा तोटा झाला होता, त्या तुलनेत सरलेल्या आर्थिक वर्षात करोत्तर नफा ८,१७२.५ कोटी रुपयांवर पोहोचला. मजबूत व्यवसाय नीतीच्या अंमलबजावणीमुळे सरलेल्या वर्षातील सर्व चार तिमाही कंपनीसाठी फायदेशीर ठरल्या आहेत, असे इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स म्हणाले.
मार्च तिमाहीअखेर इंडिगोचे प्रवासी तिकिटांचे उत्पन्न २५.५ टक्क्यांनी वाढून १५,६००.९ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. मार्चअखेरीस, इंडिगोकडे ३६७ विमानांचा ताफा होता. ताज्या अधिकृत आकडेवारीनुसार, इंडिगोचा देशांतर्गत बाजारातील हिस्सा एप्रिलमध्ये ६०.६ टक्क्यांवर पोहोचला आहे. मार्च २०२४ अखेर, कंपनीकडे ३४,७३७.५ कोटी रुपयांची रोखता आहे.





## नालेसफाईचे काम सरासरी ६० टक्के झाले

# 31 मेपर्यंत काम पूर्ण करणार

पालिका आयुक्त सौरभ राव यांचे प्रतिपादन

ठाणे (गणेश भोईटे) : ठाणे महापालिका क्षेत्रात नालेसफाईचे काम काहीसे उशिरा सुरू झाले असले तरी आता ते सरासरी ६० टक्के झाले आहे. हे काम वेगाने सुरू असून ३१ मे पर्यंत सगळे काम पूर्ण होईल, असा विश्वास ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, मुंब्रा प्रभाग समिती क्षेत्रात नालेसफाईचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला ५ जूनपर्यंत काम पूर्ण करण्याचे लक्ष्य देण्यात आले आहे, अशी माहितीही आयुक्त राव यांनी दिली.

### *नाल्यात कचरा टाकू नये यासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, युवक यांची मदत घ्यावी*

शुक्रवारी महापालिका आयुक्त राव यांनी नालेसफाईच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. प्रथम, कळवा येथील महात्मा फुले नगर येथील नाल्यातील गाळ काढण्याचा कामाचा आढावा घेतला. रस्त्यावर आलेला गाळ लवकर हटवून रस्ता पूर्णपणे वाहतुकीसाठी मोकळा करण्याच्या सूचना यावेळी त्यांनी दिल्या. वस्तीमधील नाल्यात टाकला जाणारा कचरा रोखण्यासाठी या नाल्यांवर जाळ्या बसवाव्यात. त्यात साठणारा कचरा नियमितपणे उचलला जावा. म्हणजे नाल्यात वारंवार पडणारा कचरा साठून पावसाळ्यापूर्वी होणारी कसरत आणि कोट्यवधींचा खर्च कमी होईल. त्यादृष्टीने पावले उचलण्याचे निर्देश आयुक्त राव यांनी दिले.

नाल्यात कचरा टाकू नये यासाठी मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात यावी. तसेच, स्थानिक स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट, युवक यांची मदत घ्यावी, असेही आयुक्त राव यांनी सांगितले.

त्यानंतर, उथळसर प्रभाग समितीतील ऋतू पार्क येथील नाले सफाईचे काम आयुक्तांनी पाहिले. वर्तकनगर प्रभाग समितीतील कापूरबावडी नाला, थिराणी नाला, वागळे इस्टेट मधील आनंद इंडस्ट्रीज येथील नाला, नौपाडा प्रभाग समितीतील सुपरमॅक्स कंपनी लगतचा नाला, परब वाडी येथील नाला येथे आयुक्त राव यांनी पाहणी केली.

## भिवंडी पालिकेतर्फे पूरग्रस्त भागातील नागरिकांना नोटीसा

भिवंडी : प्रभाग समिती क्रमांक एक मधील सखल भाग, डोंगरावरील राहणारे पूरग्रस्त स्थितीतील नागरिकांना महापालिकेकडून नोटीसा काढण्यात आल्या आहेत.

प्रभाग समिती क्र.१ हद्दीत असलेले नदिनाका, फरीदबाग, बारक्या कंम्पाऊंड, अवचितपाडा, आमपाडा, बाळा कंम्पाऊंड, अस्लमनगर, अंन्सार मोहल्ला, खंडूपाडा, मौलाना आझादनगर, कचेरीपाडा, संघमित्रनगर, फातमानगर, गायत्रीनगर, रामनगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पहिली बावडी, दुसरी बावडी, गाजीमिया पहाडी, दत्त मंदिर परिसर, सायरानगर, मंसूराबाद, उम्मतनगर, इस्लामनगर, न्यु.आझादनगर, बाबा हॉटले परिसर, शिव मंदिर परिसर, हालिम नगर, बैतुल उलूम चौक, कादरिया मस्जिद परिसर, चिस्तीया मस्जिद परिसर, संजयनगर, मुमताज नगर इ. भागात पावसाच्या पाण्यामुळे पूर परिस्थिती निर्माण होत असल्याने आपत्कालीन परिस्थितीत पूरग्रस्त पूरस्थितीत कोणत्याही प्रकारची जीवितवित्तहानी होऊ नये, याची काळजी घेण्यात येत आहे याचाच एक भाग म्हणून या मान्सून पूर्व तयारी म्हणून या सखल भागातील सर्व नागरिकांना, तसेच डोंगरी भागात उंच टेकड्यांवर राहणारे रहिवासी यांना पावसाळ्याच्या कालावधीत सुरक्षीत ठिकाणी स्थलांतरीत होणे करीता, सहायक आयुक्त प्रभाग समिती १ चे कार्यालयाकडून नोटीसा देण्यात आल्या आहेत. याकामी नागरिकांनी सहकार्य करावे.

### एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाईत

## ८५ हजार दंडात्मक रक्कम तसेच ३९.७५० किलो प्लास्टिक जमा



**नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्र एकल वापर प्लास्टिकमुक्त असावे यादृष्टीने महानगरपालिकेच्या वतीने याविषयी जनजागृती करण्यासोबतच महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देशानुसार एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमा प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. सर्वच विभाग कार्यक्षेत्रात संबंधित विभागांचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तेथील स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक यांच्या माध्यमातून कारवाई केली जात आहे. अशा एकल वापर प्लास्टिक प्रतिबंधात्मक मोहीमेअंतर्गत १५ ते २२ मे २०२४ या आठवड्याभराच्या कालावधीत विभागीय कार्यक्षेत्रात ७१ ठिकाणी तपासणी करण्यात आली आणि दंडात्मक कारवाई तसेच प्लास्टिक जप्तीची कारवाई करण्यात आली. यामध्ये दोषी आढळलेल्या १७ व्यावसायिक व आस्थापनांकडून एकूण रू. ८५ हजार दंडात्मक रक्कम तसेच ३९ किलो ७५० ग्रॅम प्लास्टिक पिशव्यांचा साठा तसेच एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले.**

यामध्ये बेलापूर विभागात ७ व्यावसायिक / आस्थापनांवर कारवाई करीत ३५ हजार दंडात्मक रक्कम व २४ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. वाशी विभागात ३ व्यावसायिक / आस्थापनांवर कारवाई करीत १५ हजार दंडात्मक रक्कम व ३ किलो एकल वापर प्लास्टिकची जप्ती केली. ऐरोली विभागातही ३ व्यावसायिक / आस्थापनांवर कारवाई करण्यात आली व त्यामध्ये १५ हजार दंड वसूली व १० किलो ५०० ग्रॅम एकल वापराचे प्लास्टिक जप्ती करण्यात आली. परिमंडळ २ विभागाच्या भरारी पथकाने ४ व्यावसायिकांवरील कारवाईत २० हजार दंडात्मक रक्कम वसूली आणि २ किलो २५० ग्रॅम एकल वापर प्लास्टिकचा साठा जप्त करण्यात आला. अशाप्रकारे या आठवड्यात १७ व्यावसायिक / आस्थापनांकडून ८५ हजार दंडात्मक रक्कम वसूली तसेच ३९ किलो ७५० ग्रॅम एकल वापर प्लास्टिकचे साहित्य जप्त करण्यात आलेले आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ही एकल प्लास्टिक वापर प्रतिबंधात्मक कारवाई अशीच सुरू राहणार असून नागरिकांनीही पर्यावरणास व मानवी जीवनास विघातक अशा एकल वापर प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवावा असे आवाहन करण्यात येत आहे.

## ठाणे जिल्ह्यात आरटीईसाठी ११ हजार अर्ज दाखल

ठाणे : शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेश प्रक्रियेच्या नव्या नियमावलीला उच्च न्यायालयाने स्थगिती दिली. पुन्हा पूर्वीच्या नियमावली नुसार प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी १७ मे पासून अर्ज मागविण्यात येत आहेत. ठाणे जिल्ह्यातून आरटीई साठी ६४३ शाळा पात्र असून ११ हजार ३७७ जागांसाठी ही प्रक्रिया पार पडणार आहे. गेल्या आठवड्याभरात ११ हजार ४०४ बालकांचे अर्ज दाखल झाले आहेत. पालकांना ३१ मेपर्यंत आरटीईच्या संकेतस्थळावर आपल्या बालकाची नोंदणी करता येणार आहे, अशी माहितीठाणे जिल्हा शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

सन २०२४ - २५ या शैक्षणिक वर्षाकरिता राबविण्यात येणाऱ्या आरटीई २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत राज्य सरकारने नवे बदल केले होते. या नव्या नियमावलीत विद्यार्थी राहत असलेल्या एक ते तीन किमी परिसरातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या, जिल्हा प्रशासनाच्या किंवा अनुदानित शाळांमध्येच प्राधान्याने मुलांना प्रवेश घ्यावा लागणार होता. या बदलामुळे पालकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात होता. कारण, या नव्या नियमावलीमुळे गरीब, वंचित घटकांतील विद्यार्थ्यांना नामांकित खासगी शाळांमध्ये प्रवेश मिळणे कठीण झाले होते. परंतू, अखेर मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या या निर्णयाला स्थगिती दिली. त्यामुळे पुन्हा पूर्वीच्या नियमावली नुसार प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून १७ मे पासून पालकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. ज्या पालकांनी नव्या नियमावलीनुसार १७ एप्रिल ते १० मे पर्यंत अर्ज केले होते, ते अर्ज रद्द केले असून त्यापालकांना पुन्हा अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यात महापालिका तसेच पंचायत समिती क्षेत्रातील ६४३ शाळा आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र ठरल्या असून ११ हजार ३७७ जागांसाठी ही प्रक्रिया पार पडणार आहे. ठाणे जिल्ह्यातून आठवड्याभरात ११ हजार ४०४ अर्ज दाखल झाले आहेत. तरी, ज्या पालकांनी अद्याप अर्ज दाखल केलेले नाही त्यांनी ३१ मे पर्यंत आरटीईच्या संकेतस्थळावर अर्ज दाखल करावा, असे आवाहन जिल्हा प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

### यंदा अर्ज भरण्यास मुदत वाढ मिळणार नाही

*या प्रवेश प्रक्रियेसाठी गठीत करण्यात आलेल्या पडताळणी समितीकडून प्रवेश पात्र असलेल्या बालकाचे प्रवेशाकरिता आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पडताळणी केली जाते. या समितीस पुरेसा वेळ देणे अवश्यक असून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम दिनांक ३१ मे आहे. कारण, या प्रवेश प्रक्रियेतून निवड झालेल्या मुलांचे जून मध्ये शाळा प्रवेशाची प्रक्रिया सुरु होते.त्यामुळे पालकांनी या मुदतीत अर्ज भरणे गरजेचे आहे. या प्रक्रियेस ३१ मे नंतर मुदतवाढ दिली जाणार नाही, अशी माहिति शिक्षण विभागाकडून देण्यात आली.*

## नालासोपाऱ्यात कारखान्यात थिनर टँक स्फोट

वसई: नालासोपारा पूर्वेच्या उमर कंपाउंड मधील एका कारखान्यात थिनर टँकचा स्फोट होऊन भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. गुरुवारी सकाळी सव्वा दहाच्या सुमारास ही घटना घडली. या आगीत एक कामगार होरपळून जखमी झाला आहे.

नालासोपारा पूर्वेच्या भागात जाबर पाडा, उमर कम्पाउंड, येथे स्कॅच इंजीनियर्स नावाचा कारखाना आहे. या कारखान्यात गुरुवारी सकाळी कामगार थिनर टँकचे काम करीत असताना अचानकपणे स्फोट होऊन भीषण आग लागली. या आगीची माहिती वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन दलाला मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळविले.या लागलेल्या आगीत थिनर टँकचे काम करणारा कामगार होरपळून जखमी झाला आहे. याकूब असे या जखमी कामगाराचे नाव असून त्याला रिद्धी विनायका रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. याकूब हा सुमारे ९० टक्के इतका होरपळला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले असल्याचे अग्निशमन दलाच्या जवानांनी सांगितले आहे.

## स्ट्राँग रुम भागात पुन्हा ठेकेदाराकडून खोदकाम

### विद्युत वाहिनी तोडल्याने महावितरणकडून ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल

ठाणे : घोडबंदर येथील कासारवडवली भागात एका शाळेमध्ये स्ट्राँग रुम तयार करून येथे मतदान यंत्रणा ठेवण्यात आल्या आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे जाळे येथील स्ट्राँग रुममध्ये आहे. येथील विद्युत पुरवठा खंडीत होऊ नये म्हणून महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कासारवडवली भागात कोणत्याही प्रकारचे खोदकाम करू नये असे आदेश ठेकेदारांना दिले आहेत. असे असतानाही बुधवारी एमएमआरडीएच्या ठेकेदाराने रस्ते खोदकाम करताना महावितरणची विद्युत वाहिनी तोडली.

ही वाहिनी स्ट्राँग रुमला विद्युत पुरवठा करणारी पर्यायी विद्युत वाहिनी होती. सुदैवाने स्ट्राँग रुममधील विद्युत पुरवठा सुरळीत होता. या गंभीर प्रकारानंतर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदाराविरोधात कासारवडवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वीच महापालिकेच्या ठेकेदारानेही अशाचप्रकारे विद्युत वाहिनी तोडली होती. असे असतानाही पुन्हा विद्युत वाहिनी तोडण्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) मुख्य रस्ता सेवा रस्त्यामध्ये सामाविष्ट करण्याचे कार्य सुरू आहे. कासारवडवली येथील कावेसर परिसरातील या कामाचा ठेका देव इंजिनिअर्स प्रा. लि. या कंपनीला देण्यात आला आहे. बुधवारी दुपारी कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी खोदकाम करताना येथील सेवा रस्त्याखालून गेलेली विद्युत वाहिनी तोडली. या कामामुळे परिसरातील विद्युत पुरवठा खंडीत झाला. याबाबत महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना माहिती मिळाल्यानंतर कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. ही विद्युत वाहिनी स्ट्राँग रुमला विद्युत पुरवठा करण्यासाठी पर्यायी व्यवस्था होती. स्ट्राँग रुमला विद्युत पुरवठा करणारी मुख्य वाहिनी सुस्थितीत असल्याने स्ट्राँग रुमच्या विद्युत पुरवठ्यावर परिणाम झाला नाही. हे प्रकरण गांभीर्याने घेऊन महावितरणच्या अधिकाऱ्यांनी कासारवडवली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार, देव इंजिनिअर्स प्रा. लि. कंपनीच्या मालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी याच भागात ठाणे महापालिकेच्या ठेकेदाराने रस्त्याचे खोदकाम करताना एक विद्युत वाहिनी तोडली होती. महावितरण कंपनीनने आदेश देऊनही ठेकेदारांकडून खोदकामे सुरूच आहेत.

### आग



*वागळे इस्टेट , रोड नं.१४ हाजुरी येथील रेप्रोफ्लेक्स - ३ इंडिया प्रा. लि. या कंपनीमध्ये रबर फ्लेक्स बनविणाऱ्या मशिनला आग लागली होती.*

## पत्नीची छेड काढत असल्याने मित्राची हत्या

वसई : पत्नीची छेड काढल्याने मित्राची हत्या केल्याचे प्रकरण विरारमध्ये उघडकीस आले आहे. या प्रकरणी विरार पोलिसांनी आरोपी मित्राला अटक केली आहे. एक महिन्यापूर्वी आरोपीने आपल्या मित्राची हत्या केली होती. एप्रिल महिन्यात विरार पूर्वेच्या साईनाथ नगर येथील डोंगरावर एका इसमाचा मृतदेह आढळला होता. त्याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. त्याच्या हातावर 'शारदा' असे नाव गोंदविलेले होते. काही दिवसांनी रमेश नायर (४८) नावाचा इसम बेपत्ता असल्याची तक्रार त्याच्या नातेवाईकांनी दिली. त्याची पडताळणी केली असता डोंगरावर आढळलेला मृतदेह हा रमेश नायरचा असल्याचे स्पष्ट झाले होते. शारदा हे मयत रमेश नायरच्या पत्नीचे नाव होते. शवविच्छेदनात त्याच्या छातीवर मार लागल्याने मृत्यू झाल्याचे उघड झाले. त्यामुळे विरार पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला होता. मात्र त्याची हत्या का आणि कुणी केली याचा उलगडा होत नव्हता.

## नवी मुंबई पालिकेतर्फे १४५ अनधिकृत झोपड्या भुईसपाट

नवी मुंबई : नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अे विभाग बेलापूर कार्यालया अंतर्गत पंचशिल नगर, शाहबाज टेकडी, बेलापूर, नवी मुंबई येथे अनधिकृतपणे झोपड्या उभारण्यात आलेल्या होत्या.

आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनानुसार अे विभाग बेलापूर कार्यालयाचे शशिकांत तांडेल (सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी) यांच्या नियंत्रणाखाली सदर पंचशिल नगर, शाहबाज टेकडी, बेलापूर, नवी मुंबई येथील १४५ अनधिकृत झोपड्या अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करुन निष्कासित करण्यात आल्या आहेत. या धडक मोहिमेसाठी अे विभाग कार्यालय अगंतर्गत बेलापूर मधील अधिकारी/ कर्मचारी मयुरेश पवार (कनिष्ठ अभियंता), स्वप्निल तारमळे (वरिष्ठ लिपिक), नयन भोईर (लिपिक) हजर होते, सदर कार्यवाही करिता १५ मजूर, ०१ गॅसकटर, ०१ जे.सी.बी, ०१ पिकअप तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते.यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.










### पोलीस आणि पालिका अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

# एमआयडीसीला भंगार गोदामांचा विळखा

कल्याण : मुंबईच्या विविध भागातून, कुर्ला परिसरातून काही वर्षापूर्वी हटविलेले बहुतांशी बडे भंगार विक्रेते डोंबिवली, शिळफाटा, दहिसर-मोरी परिसरात येऊन स्थिरावले आहेत. २७ गाव हद्दीतील गोळवली, सोनारपाडा, पिसवली, व्दारली, उंबार्ली हा भंगार गोदामांचा पट्टा म्हणून ओळखला जातो.या भंगारा गोदामांमुळे यापूर्वी या भागात आगीच्या घटना घडल्या आहेत. डोंबिवली एमआयडीसी परिसरात स्थानिकांच्या मदतीने वन, सरकारी, पालिकेच्या आरक्षित भूखंडांवर ही बेकायदा गोदामे सुरू करण्यात आली आहेत. डोंबिवली परिसरात भंगार संकलकांकडून जमा होणारे भंगार या बड्या भंगार विक्रेत्यांना विकले जाते. याशिवाय जुन्या कंपन्या, इमारतींमधील भंगार हे विक्रेते विकत घेतात. एमआयडीसी परिसरात तांब्याच्या तारा, लोखंड आणि उत्पादन प्रक्रियेशी महत्वाच्या सामानांची चोरट्यांनी चोरी केली की ते चोरीचे साहित्य भंगार विक्रेते कमी किमतीला विकत घेऊन त्याची विल्हेवाट लावतात.

> कल्याण, डोंबिवलीसह २७ गाव हद्दीत सरकारी, वन जमिनींवर सर्व बडे भंगार विक्रेते हे मुंबईतून हटविल्यानंतर या भागात आले आहेत. चोऱ्यांतून मिळणारे सामान घेऊन त्यांची विक्री करणे हे यांचे उद्योग आहेत. एमआयडीसीतील चोऱ्यांमधील सामान हेच विक्रेते खरेदी करतात. यांना स्थानिक यंत्रणेचा पाठिंबा असल्याने ते येथे उद्योग करतात. या विक्रेत्यांमुळे काही दुर्घटना घडली तर स्थानिकांचे जीव धोक्यात आहेत आणि प्रसंगी कायदा सुव्यवस्थेचा पण प्रश्न निर्माण होऊ शकतो. स्थानिक पालिका, पोलिसांचे या विक्रेत्यांशी संगनमत आहे. त्यामुळे शासनाने हे भंगार विक्रेते हटविण्यासाठी पुढाकार घ्यावा.
>
> -संदेश प्रभुदेसाई, व्यावसायिक

■ या भंगार विक्रेत्यांना स्थानिक पोलीस, शासकीय, कल्याण डोंबिवली पालिका यंत्रणा यांचा पाठिंबा आहे. दर महिन्याला स्थानिक पोलिसांची या भागात एक फेरा असतो. मानपाडा पोलीस ठाण्यात या भंगार गोदामांमुळे वरिष्ठ अधिकाऱ्याचे पद मिळवण्यासाठी मोठी चढाओढ लागते, अशी पोलीस दलात चर्चा आहे.

■ आपल्या हद्दीत बेकायदा भंगार विक्रेत्यांवर कारवाई करण्याचे अधिकारी स्थानिक कल्याण डोंबिवली पालिकेचे अधिकारी, स्थानिक पोलीस अधिकारी यांना आहेत. या यंत्रणा काही दुर्घटना घडल्याशिवाय कधीच भंगार विक्रेत्यांवर कारवाई करत नाहीत. गेल्या दोन महिन्यापूर्वी गोळवली भागात दुपारच्या वेळेत भंगार गोदामांना भीषण आग लागून परिसरातील दुकाने बेचिराख झाली होती.

■ २७ गाव भागातील बेकायदा भंगार विक्रीची दुकाने ही कल्याण डोंबिवली शहरांना लागलेली किड आहे. ७ डिसेंबर २०१३ रोजी शिळफाटा रस्त्यावरील गोळवली भागातील गायकर कम्पाऊंडमध्ये एका भंगार दुकाना बाहेरील बॉयलरची तोडफोड करताना भीषण स्फोट होऊन तीन कामगार ठार आणि लगतची घरे आगीने प्रभावीत झाली होती. ९ डिसेंबर २०२० रोजी सोनारपाडा येथील एका भंगार गोदामाला आग लागून ४० गाळे खाक झाले होते.

■ शिळफाटा रस्त्यावरील दहिसर-मोरी परिसरात मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर भंगार विक्रीची भव्य दुकाने उभी आहेत. तरीही महामार्ग प्राधिकरण या दुकानांवर कारवाई करत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. या सर्व बेकायदा भंगार दुकानांना महावितरणची चोरून वीज वापरल्याच्या तक्रारी आहेत. आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी आता प्रभावीणपणे सक्रिय होऊन २७ गाव परिसरातील बेकायदा भंगार गोदामांवर कारवाई करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## सिडकोच्या ऑनलाईन लिलावामध्ये घोटाळ्याची साशंकता

पनवेल : सिडको महामंडळाने नूकतीच बामनडोंगरी येथील दुकानांसाठी ऑनलाईन बोलीपद्धतीने लिलाव आयोजित केला होता. मात्र लिलाव अंतिम टप्यात असताना सिडकोचे संकेतस्थळावर काहीच हालचाली होत नसल्याने गुंतवणूकदारांनी संताप व्यक्त करत लिलावात काही काळंबेरं असल्याचा आरोप केला आहे. याबाबत सिडको मंडळाने स्पष्टीकरण देऊन काही काळांसाठी तांत्रिक अडचणी असल्याने ही अडचण झाल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. यानंतर गुंतवणूकदारांनी बामनडोंगरी येथील दुकानांचा लिलावाचा कार्यक्रम पुन्हा आयोजित करावा अशी मागणी समाजमाध्यमांवर केली आहे. सिडको मंडळातील महागृहनिर्माणाची आणि दुकानांची सोडत ऑनलाईन पद्धतीने होते.

दक्षिण नवी मुंबईत विक्रीसाठी अजूनही सिडको महामंडळाला वाव असल्याने या परिसरातील घर, भूखंड आणि दूकाने यांच्या लिलावातून मिळणाऱ्या उत्पन्नामुळे सिडकोच्या तिजोरीत भरभराट आहे. सिडको मंडळाने यापूर्वीही भूखंड लिलाव आणि महागृहनिर्माणातील घर व दुकानांच्या सोडतीची प्रक्रिया पारदर्शक असल्याचा दावा केला आहे. नुकत्याच घडलेल्या बामणडोंगरी येथील दूकानांच्या लिलावामध्ये सहभागी झालेल्या गुंतवणूकदारांनी सिडकोच्या कार्यप्रणालीविषयी साशंकता व्यक्त करत बोली लावताना ऐनवेळेला बंद पडलेल्या ऑनलाईनपद्धतीमुळे लिलावात सामिल होता आले नसल्याचा आरोप करत ही प्रक्रिया राबविणाऱ्या कंपनीला काळ्या यादीत टाकावे अशी मागणी समाजमाध्यमांवरुन केली आहे. तसेच हा लिलाव पुन्हा आयोजित करावा असेही अनेक गुंतवणूकदारांनी मागणी केली आहे. याबाबत सिडको महामंडळाच्या जनंसपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांनी काही काळासाठी तांत्रिक अडचण झाली होती असे स्पष्टीकरण देताना या घटनेनंतर सिडको मंडळ लवकरच ही अडचण का निर्माण झाली याची तपासणी करणार असल्याचे रातांबे यांनी स्पष्ट केले आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१